Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# नाशिक जिल्हयातील मालेगांव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्ययन

पंकज त्रंबक निकम

(सहायक प्राध्यापक)
अर्थशास्त्र विभाग, म.वि.प. समाजाचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
सोयगांव ता.मालेगांव, जि.नाशिक पुणे विद्यापीठ.

**सारांश :**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. सुमारे देशातील एकूण लोकसंख्येच्या 65% लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. १९६० ते ७० च्या दशकातील हरितक्रांतीच्या यशस्वी प्रयोगामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ होवून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपुर्णतः प्राप्त करण्यात आली आहे. १९९१ च्या नविन आर्थिक धोरणानंतर व १९९५ मधील WTO च्या करारात शेती क्षेत्राचा अंतर्भाव केल्यानंतर शेती क्षेत्राचे स्वरूप बदलत आहे. शेतमाल उत्पादनानंतर महत्वाचा भाग म्हणजे उत्पादित शेतमालाची विक्री होय, शेतमालास योग्य किंमत मिळावी यासाठी नियंत्रित बाजारांची स्थापना करण्यात आली या बाजारांची कृषी अर्थशास्त्र आणि पर्यायाने शेतमाल विक्रीव्यवस्था यासंदर्भातील भूमिका महत्वपूर्ण असल्याची दिसून येते. प्रस्तुत लेखात नाशिक जिल्हयातील मालेगांव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्ययन करण्यात आले आहे.

## प्रास्ताविक

शेती क्षेत्रातील दोष दूर करण्यासाठी संस्थात्मक व संघटनात्मक सुधारणांची सुरूवात करण्यात आली, त्याचाच एक भाग म्हणून नियंत्रित बाजारांची संख्या वाढविण्यात आली. बाजारपेठांचा विस्तार करण्यापाठीमागचा हेतू शेतकर्यांचे शोषण थांबविणे व शेतमालाच्या किंमती उघड लिलाव पध्दतीने ठरविणे हे होते, शेती विकासाचा धो रणात्मक भाग म्हणून नियंत्रित बाजारपेठांना आलेले हे महत्व लक्षात घेऊनच प्रस्तुत अध्ययन हे नियंत्रित बाजार पेठेचे करण्यात आले आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टये :-

१)भारतातील कृषीमाल विक्रीव्यवस्थेचा अभ्यास करणे.
२)मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीतील शेतमाल विक्रीव्यवस्थेचा अभ्यास करणे.

## अभ्यासाची गृहितके :-

१)मालेगांव तालुक्यातील शेतकरी मोठया प्रमाणात उत्पादित शेतमालाची विक्री मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीत करतात.
२)मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीमुळे बाजाराशी संबंधीत घटकांना लाभ होत आहेत.

## संशोधन पध्दती :-

प्रस्तुत अध्ययनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनसामुग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

## प्राथमिक सामुग्री :-

प्राथमिक सामुग्री संकलनासाठी मुलाखत, प्रत्यक्ष निरीक्षण यांचा आधार घेण्यात आला आहे.

## दुय्यम साधनसामुग्री :-

दुय्यम सामुग्री संकलनासाठी मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल, शिवाय प्रकाशित व अप्रकाशित लिखीत स्वरूपाच्या माहितीचा आधार तसेच दैनिके, मासिके, ग्रंथ इ.चा दुय्यम सामुग्रीमध्ये वापर करण्यात आला आहे.

**मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचा रचना ៖**

कृषी उत्पन्न बाजार अधिक कार्यक्षम असेल तर त्या बाजाराची प्रगती होते मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचा रचना पुढीलप्रमाणे आहे .

## मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समिती मुख्य बाजार




मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य बाजार तसेच पाच उपबाजार कार्यरत आहेत . मालेगांव बाजार समितीचा स्थापना ११ .११ .१९४८ रोजी झाली . तसेच त्यानंतर उमराणा उपबाजाराची स्थापना दि .१० .०९ .१९५७ रोजी झाली . तसेच झोडगे उपबाजाराची स्थापना दि .२७ .१० .१९८३ रोजी झाली जळगांव ह्यनिंह उपबाजार दि .१७ .०६ .१९८९ निमगांव उपबाजार दि .२५ .१२ .१९८९ रोजी सुरू करण्यात आले .
तसेच सन २०११ मध्ये मुंगसे या उपबाजाराची स्थापना करण्यात आली .

**मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार व उपबाजार आवारात**

**पुरविलेल्या सुविधा :-**

मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात प्रामुख्याने ऑफिसबिल्डींग लिलावशेड गोडाऊन गाळे आडत्यांचे गाळे पोस्ट ऑफिस पिण्याच्या पाण्यासी सोय शेतकरी निवास बॅक कॅन्टीन ग्रडींग साहित्य अंतर्गत रस्ते स्वच्छता गृहे स्ट्रीट लाईटींग वॉल कंपाऊड एस .टी .डी .बुथ दुरध्वनी म .स्टेट वेअरहाऊस गोडाऊन गुरांचा धक्का वे ब्रिज (खाजगी) वॉटर कुलर शेतकरी शौचालय इ .सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत .

उमराणा उपबाजारात ऑफिसबिल्डींग लिलावशेड पिण्याच्या पाण्याची सोय दिवाबत्ती वॉल कंपाऊंड दुरध्वनी लिलावशेड ओटा शेतकरी शौचालय इ .सुविधा तसेच घोडगे उपबाजारात ऑफिसबिल्डींग लिलावशेड पिण्याच्या पाण्याची सोय दिवाबत्ती स्ट्रीट लाईट या चारच सुविधा तर जळगांव (नि) उपबाजार पिण्याच्या पाण्याची ही एकच सुविधा आणि निमगांव उपबाजारात कोणतीही सुविधा पुरविण्यात आलेली नाही .
वरील प्रमाणे मालेगांव मुख्य बाजार आणि उपबाजार आवारात इ .सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत .

**मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीतील नियमनाखालील वस्तू ៖**

तांदुळ ज्वारी मका बाजरी नागली जव हरभरा मठ मुग तुर उडिद मसूर चवळी वाल वाटाणा कुळथी मेथी मिरची कपाशी भुईमूग शेंगा शेंगदाणे एरंडी तिळी राई करडई आळशी सरकी गुळ धने चिंच लसुन गवत ह्यवैरणह अंबाडी कांदा आंबा ह्यकैरीह मोसंबी संत्री केळी द्राक्षे डाळींब चिकू सफरचंद खरबुज कलींगड पपई पेरू बोर सिताफळ रताळु लिंबु बटाटे सुरन सूर्यफूल सोयाबीन पालेभाज्या इ .शेतीमाल तसेच गाय बैल म्हैस रेडा घोडे शेळया मेंढया इ .जनावरांची खरेदी विक्री बाजारात केली जाते .

**मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीतील शेतमालाची एकूण आवक**

(उपबाजारासह)

मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीत नियमनाखालील सर्व वस्तुंची खरेदी विक्री होत असल्याने तालुक्यातील असंख्य शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी बाजारात आणत असतात सन २००५ ते सन २००९१० या पाच वर्षाच्या कालखंडात मालेगांव कृषी बाजार समितीत झालेली शेतमालाची एकूण आवक पुढील कोष्टकात

दाखविली आहे.

| अ.क. | वर्ष | शेतमालाची आवक (क्विंटलमध्ये) |
|---|---|---|
| ०१ | २००५-०६ | ३१,८२,०२७ |
| ०२ | २००६-०७ | २६,६७,१२७ |
| ०३ | २००७-०८ | २३,६,९५१४ |
| ०४ | २००८-०९ | ४७,३५,३५३ |
| ०५ | २००९-१० | ४८,४०,६२७ |

स्त्रोत ः- मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समिती वार्षिक अहवाल सन २००६ ते २०१०.

वरील कोष्टकात मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीतील शेतमालाची आवक दाखविली असून 2005-06 ते 2009-10 या कालखंडात कसा बदल झाला आहे हे लक्षात येते सन 2005-06 च्या तुलनेत सन 2006-07 आणि सन 2007-08 या वर्षी शेतमालाची आवक कमी झालेली आहे सन 2008-09 मध्ये त्यात दुपटीने वाढ झाली आहे. तसेच सन 2009-10 मध्ये अल्पशा प्रमाणात शेतमालाची आवक वाढली आहे.

**मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीतील शेतमालाची विक्री किंमत :-**

सन 2005-06 ते 2009-10 या पाच वर्षाच्या कालखंडात बाजारात आलेल्या शेतमालाची विक्री किंमत पुढील तक्त्यात दाखविली आहे.

| अ.क. | वर्ष | शेतमालाची विक्री किंमत (अब्ज रूपये) |
|---|---|---|
| ०१ | २००५-०६ | १,०८,६९,२४,६०९ |
| ०२ | २००६-०७ | १,९०,३०,०५,७३३ |
| ०३ | २००७-०८ | १,०६,००,१५,१८० |
| ०४ | २००८-०९ | ३,२५,७८,३३,५८८ |
| ०५ | २००९-१० | ३,८४,४८,८३,६१४ |

स्त्रोत ः- मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समिती वार्षिक अहवाल सन २००६ ते २०१०

वरील कोष्टकात शेतमालाची विक्री किंमत दाखविली असून ती सन 2005-06 मध्ये १०८६९२४६०९ अब्ज रू एवढी होती ती सन 2009-10 मध्ये ३८४४८८३६१४अब्ज रू एवढी होती सन 2005-06 ते 2009-10 या कालावधीत शेतमालाच्या विक्री किंमतीत 2007-08 हे वर्ष वगळता वाढ झालेली आहे.

**मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न खर्च वाढावा / तुट बाजारनिधी**

सन 2005-06 ते 2008-09 या पाच वर्षात बाजार समितीच्या ताळेबंदाविषयी माहिती पुढील कोष्टकात दाखविली आहे.

DSpace™

(लाख / कोटी रूपये)

| अ.क | वर्ष | एकूण उत्पन्न | एकूण खर्च | वाढवा / तुट | बाजार निधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २००५-०६ | १,३९,०७,२८५ | १,०५,५९,०२० | ३३,४८,२६५ | २,४४,५६,२३५ |
| ०२ | २००६-०७ | २,२३,३७,८६८ | १,३७,१६,०६९ | ८६,२१,७९८ | ३,३०,७८,०३४ |
| ०३ | २००७-०८ | १,३२,६३,४२८ | ८८,४८,०७५ | ४४,१५,३५२ | ३,७४,९८,३८६ |
| ०४ | २००८-०९ | ३,९५,६७,४३४ | २,२३,३१,२२० | १,७२,३६,२१४ | ५,४७,२९,६०१ |
| ०५ | २००९-१० | ४,४३,७२,९४५ | २,४४,६६,४३७ | १,९९,०६,५०८ | ७,४६,३६,१०९ |

स्त्रोत ः- मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समिती वार्षिक अहवाल सन २००६ ते २०१०

वरील कोष्टकात सन 2005-06 या कालखंडातील बाजार समितीचे उत्पन्न खर्च वाढावा, तुट आणि बाजारनिधी दाखविला आहे. बाजार समितीच्या उत्पन्न व खर्चात झालेल्या बदलामुळे समितीच्या वाढावा, तुट आणि बाजारनिधीत बदल झालेला आहे. सन 2007-08 हे वर्ष वगळता इतर वर्षी बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. तसेच सन 2007-08 या वर्षी बाजार समितीच्या खर्चात घट दिसून येते. सन 2005-06 ते 2009-10 या कालखंडात बाजार समितीला लाभ झाल्याचे दिसून येते आणि सन 2005-06 मध्ये २४४५६२कोटी रू. असलेला बाजारनिधी सन 2009-10 मध्ये ७४६३६१०९ कोटी रू. इतका झाला आहे.

**अभ्यासाचे निष्कर्ष :-**

मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचा अभ्यास केल्यानंतर बाजार समितीच्या प्रगतीचा आलेख उंचावत असल्याचे दिसून आले तसेच बाजार समितीच्या कार्यात काही उणीवाही दिसून आल्या. यावरून पुढील निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**बाजार समितीची प्रगती दर्शविणारे निष्कर्ष :-**

१)मालेगांव बाजार समितीचे कामकाज समाधान कारक चालते असे सचिव यांचेशी घेतलेल्या मुलाखतीवरून आढळून आले.
२)मालेगांव बाजार समितीत शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शेतर्कयांसाठी आणि इतर घटकांसाठी विविध सुविधा पुरविण्यात आलेल्या असल्याचे दिसून येते.
३)कोणत्याही क्षेत्रात कर्मचारी वर्गास जेवढया अधिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात तेवढया प्रमाणात त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ दिसून येत असते मालेगांव बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी यांना वेतन वाढ रजा महागाई भत्ता गणवेश भविष्यनिर्वाहनिधी निवृत्ती वेतन साप्ताहिक सुट्टी वैद्यकिय सुविधा इ.सुविधा पुरविलेल्या दिसून येतात.
४)मालेगांव तालुक्यात जवळपास १५० गावांचा समावेश होतो. शेतमालाच्या विपणन व्यवस्थेत सुरळितपणा येण्यासाठी मालेगांव मुख्य बाजाराव्यतिरिक्त उमराणा उपबाजार झोडगे उपबाजार जळगांव ह्यनिंह उपबाजार निंमगांव उपबाजार मुंगसे उपबाजार सुरू केल्याचे दिसून येतात.
५)मालेगांव बाजार समितीची हिशोब तपासणी नियमितपणे केली जाते म्हणजे दरवर्षी बाजार समितीचे अंदाजपत्रक तयार करून त्यास मंजूरी घेतली जाते.
६)बाजार समितीद्वारे कर्मचारी वर्गास वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते शिवाय बाजार समितीकडून प्रशिक्षण योजना राबविल्या जातात.
७)सन 2005-06 ते 2009-10 या कालखंडातील मालेगांव बाजार समितीतील शेतमालाची आवक आणि शेतमालाची विक्री यांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.
८)मालेगांव बाजार समितीला अभ्यास कालावधीत सतत नफा, वाढावा मिळालेला आहे तसेच याच कालावधीत बाजारनिधीतही मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसुन येते त्यामुळे बाजार समितीने विविध विकासकामे आपल्या हाती घेतले आहेत.

**मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यपध्दतीतील उणीवा / दोष :-**

१ मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीकडून ज्या सुविधा पुरविल्या जातात. त्यात शेतकयांसाठी 'शेतकरी निवास' ही सुविधा पुरविली जात नाही. यामुळे लांब अंतरावरून शेतमाल विक्रीसाठी येर्णाया शेतर्कयांची गैरसोय होत असल्याचे दिसते.
२ मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीकडून 'बाजार माहिती केंद्र' ही सुविधा पुरविली जात नाही.
३ मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीकडून 'शीतगृह' ही सुविधा पुरविली जात नाही.
४ सन २००६०७ ते २००७०८ या वर्षी शेतमालाची आवक घटलेली असल्यामुळे सन २००७०८ या वर्षी शेतमालाच्या विक्री किंमतीत घट झाल्याचे दिसून येते.
५ बाजार समितीकडे मोठया रकमेचा बाजारनिधी शिल्लक आहे.

**शिफारशी :-**

१ मालेगांव कृषी बाजार समितीचा केंद्रबिंदु म्हणजे शेतकरी होय. शेतर्कयांसाठी निवासाची व्यवस्था समितीकडून केली गेली पाहिजे. लांब अंतरावरून येर्णाया शेतर्क

यांसाठी निवासाची सोय समिती कडून उपलब्ध झाल्यास त्याचा परिणाम शेतमालाची आवक वाढून बाजार समितीला त्याचा लाभ होऊशकेल.
२ मालेगांव बाजार समितीकडून बाजार माहिती केंद्राची सोय उपलब्ध करून दिली पाहिजे.
३ मालेगांव बाजार समितीकडून शीतगृहाची सुविधाही उपलब्ध करून दिली पाहिजे.
४ मालेगांव कृषी बाजार समितीत डाळींब निर्यात केंद्र सुरू झाले पाहिजे. व त्याचा प्रभावी व काटेकोरपणे वापर केला पाहिजे. कारण मालेगांव तालुक्यात मोठया प्रमाणात डाळींबाचे उत्पादन घेतले जाते. बाजार समिती आवारात डाळींब निर्यात केंद्र सुरू झाल्यास त्याचा सर्वाधिक फायदा शेतकरी वर्ग व बाजाराशी संबंधीत सर्व घटकांना होऊशकेल.
५ बाजार समिती प्रसारीत करण्यासाठी मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समिताकडून आकाशवाणी मासिके तसेच इतर काही प्रभावी साधनांचा वापर केला पाहिजे.
६ मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मालेगांव तालुक्यातील शेतमालाची मागणी आणि पुरवठा याविषयी माहिती गोळा करण्यात आली पाहिजे. कारण मागणी पुरवठा याची कल्पना बाजार समितीस आल्यास विक्री व्यवस्थेत अजुन सुसुत्रता निर्माण होईल.
७ बाजार समितीने बाजारनिधीचा वापर बाजाराच्या विकास योजनांसाठी पुरेशा प्रमाणात केला पाहिजे.

संदर्भ :-

१ प्रा.सराफ मोहन् प्रा.आचार्य ना.मा ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार १९९१ विद्या प्रकाशन् नागपुर.
२ रूदार दत्त् के.पी.एम. सुंदरम इंडीयन इकोनॉमीं २००७ एस. चांद् न्यु दिल्ली.
३ व.शं. जोशी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व अधिनियम) अधिनियम 1963, 2008, न्यायदीप प्रकाशन् पुणे.
४ मालेगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सन 2005-06 ते 2009-10 पर्यंतचे वार्षिक अहवाल.
५ डॉ.प्रदिप आगलावे संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे - 2000 विद्या प्रकाशन नागपुर.
६ विविध दैनिक वर्तमानपत्रे.
७ मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाचे विविध अंक.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net